सकाळ

# कोरे फार्मसी महाविद्यालयाचा सन्मान

## महाविद्यालय देशात पहिल्या शंभरात; तिसऱ्यांदा मानाचे स्थान

वारणानगर, ता. १८ : भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने जाहीर केलेल्या नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क (निर्फ) म्हणजे 'राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी २०२१' मध्ये वारणा विभाग शिक्षण मंडळ संचालित तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसीने ७६ ते १०० रँक बॅण्ड म्हणजेच देशातील पहिल्या १०० महाविद्यालयांत तिसऱ्यांदा मानाचे स्थान पटकावले. शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या केवळ दोनच फार्मसी कॉलेजचा समावेश असल्याची माहिती वारणा विभाग शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे यांनी दिली.



वारणानगर : येथील तात्यासाहेब कोरे फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जॉन डिसोझा, शिक्षकांचा सत्कार करताना आमदार डॉ. विनय कोरे.

डॉ. कोरे म्हणाले, "अध्यापनासाठी आवश्यक मनुष्यबळाची उपलब्धता, आर्थिक विश्वसनीयता; महाविद्यालयातील संशोधनाची संशोधनपर लेख आणि बौद्धिक संपदा यातून सिद्ध झालेली गुणवत्ता, महाविद्यालयात राबवलेले सक्षमता विकास उपक्रम; नोकरी-व्यवसाय करण्यात तसेच उच्चशिक्षण घेण्यात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी संपादित केलेले यश; सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित घटकांसाठी उपलब्ध संसाधने आणि महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेल्या पदवीधरांच्या गुणवत्तेबाबतीत संबंधित उद्योग-व्यवसाय देशातील नावाजलेल्या संस्था आणि शिक्षणतज्ज्ञांचे असलेले मत या निर्देशांकावर आधारित हे रँकिंग आहे. विद्यार्थ्यांची पटसंख्या, आर्थिक जमा-खर्च आणि शिक्षकांची नावे इतकीच माहिती महाविद्यालयाकडून घेतली जाते. संस्थेचे अध्यक्ष डॉ. विनय कोरे, प्रशासकीय अधिकारी डॉ. वासंती रासम यांचे मार्गदर्शन, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांचे योगदान असल्याचे डॉ. डिसोझा यांनी सांगितले. समन्वयक डॉ. अरेहल्ली मंजाप्पा, कॉलेजच्या प्रशासकीय अधिकारी डॉ. उज्ज्वला चौगुले, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

Kolhapur, Kolhapur-Today
19/09/2021 Page No. 4

तरुण भारत

# वारणेची तात्यासाहेब कोरे फार्मसी देशात शंभरामध्ये

## आमदार डॉ. विनय कोरे यांची माहिती : निर्फच्या क्रमवारीत तिसऱ्यांदा बहुमान

प्रतिनिधी
वारणानगर

भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने नुकत्याच जाहीर केलेल्या नॅशनल इंस्टीटयूशनल रँकिंग फ्रेमवर्क (निर्फ) म्हणजे राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी २०२१ मध्ये वारणा विभाग शिक्षण मंडळ संचलित तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसीने ७६ ते १०० रँक बॅण्ड म्हणजेच देशातील पहिल्या १०० महाविद्यालयामध्ये तिसऱ्यांदा मानाचे स्थान पटकावले. कोल्हापूर-सांगली-सातारा जिल्ह्यातील शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या २८८ कॉलेजपैकी केवळ दोनच फार्मसी कॉलेजचा समावेश असल्याची माहिती वारणा विभाग शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



वारणानगर : येथील तात्यासाहेब कोरे फार्मसी महाविद्यालय देशात शंभरमध्ये आल्याबद्दल प्राचार्य डॉ. जॉन डिसोझा, शिक्षकांचा सत्का करताना वारणा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष, आमदार डॉ. विनय कोरे.

डॉ. कोरे म्हणाले, अध्यापनासाठी वश्यक मनुष्यबळाची उपलब्धता, नोकरी-वसाय करण्यात तसेच उच्चशिक्षण घेण्यात ाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी संपादित केलेले महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेल्या उद्योग-व्यवसाय देशातील नावाजलेल्या संस्था आणि शिक्षणतज्ञांचे असलेले मत या निर्देशकांवर आधारित हे रँकिंग आहे. विद्यार्थ्यांची पटसंख्या, आर्थिक जमा-खर्च आणि शिक्षकांची नावे इतकीच माहिती महाविद्यालयाकडून घेतली जाते. इतर सर्व माहिती स्वतंत्र एजन्सीद्वारे गोळा केली जात असल्याने निर्फ रँकिंगला शिक्षण क्षेत्रात

निर्फ रँकिंग मध्ये तिसऱ्यांदा स्थान पटकावून खऱ्या अर्थाने फार्मसी अभासक्रमातील दर्जेदार शिक्षण देणारं महाविद्यालय असल्याचे तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसीने सिद्ध केलं आहे. ज्ञानदानाच्या सर्वोत्कृष्ट पद्धती, गुणवत्तापूर्ण संशोधन, आणि सामाजिक कार्यात सहभाग या त्री-सूत्रीच्या जोरावर विद्यार्थ्यांचा समग्र ... महाविद्यालय सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचा मला आज विशे आनंद आहे. डॉ. वासंती रासम य मार्गदर्शन, शिक्षक-शिक्षकेतर कर्मच विद्यार्थी यांचे सर्वतोपरी योगदान असल प्राचार्य डॉ. डिसोझा यांनी सांगितले.

महाविद्यालयातील निर्फ समन्वयक अरेहल्ली मंजाप्पा, कॉलेजच्या प्रशास अधिकारी डॉ. उज्ज्वला चौगुले आदींसह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित ह